MHKO050018142013

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ३२०/२०१३ मधील**
**नि. ११० वरील आदेश**
**शिवगोंडा पाटील विरुध्द बाळगोंडा पाटील**

सदरचा अर्ज हा वादी यांनी यातील प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता झालेल्या दिनावधीची माफी करीता दाखल केला आहे. यातील प्रतिवादी हे दि. २७/०२/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्याचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता वारसाचा दाखला मिळालेला नाही. वादी हा शेतकरी आहे. दावेचे कामी वारस मुदतीत रेकॉर्डवर आणणे जरुर आहे याची वादीस माहिती नाही. त्यामुळे मयत प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेल्या दिनावधीची माफी मिळावी. तसेच या कामी झालेले अबेटमेंट रद्द व्हावे आणि प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर आणून दावेचे काम पुढे चालणेस न्यायास मदत होणार आहे. तरी सदर विलंब माफ होवून सदरचा अर्ज मंजूर करावा, अशी विनंती वादीने केली आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी १२२ कडे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार अर्जातील कथने धादांत, खोटी व लबाडीची, वस्तूस्थितीशी विपर्यास करणारी असल्याने प्रस्तुत प्रतिवादी त्याचा साफ इन्कार करतात. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज कायदयातील कोणत्या तरतुदीखाली दाखल केलेला आहे त्याचा उहापोह वादी यांचे अर्जात नमूद केलेला नाही. वादी यांनी विलंब कोणत्या कारणामुळे झाला याचे स्पष्टीकरण अर्जात नमूद केलेले नसल्यामूळे प्रस्तुत अर्जाचा विचार करता येणार नाही. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंब माफ होवून मिळणेकरीता दाखल केला असून अर्जाचे कामी अबेटमेंट रद्द होणेची मागणी केलेली आहे त्यामूळे जोपावेतो वादी हे स्वतंत्रपणे विलंब माफीचा व अबेटमेंट सेटअसाईटचा अर्ज दाखल करत नाहीत तोपर्यंत वादीचा प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नाही. वादी यांनी प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता किती दिवसांचा विलंब झालेला आहे याबाबतचा कोणताही उहापोह अर्जाचे कामी केलेला नाही. जरुर तर म्हणणे दुरुस्त करु तरी तशी परवानगी असावी. सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

४. सदर अर्ज दाखल करण्यास बराच विलंब झाला आहे. निशाणी ११३ च्या दस्तऐवज यादी सोबत वादी यांनी मयत बाळगोंडा नागोंडा पाटील यांचे मृत्यू प्रमाणपत्र प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यानूसार असे दिसते की, त्यांचा मृत्यू दि. २७/०२/२०२१ रोजी झाला. सदर अभिलेख पाहिला असता निशाणी ११० वरील अर्ज दि. १७/०२/२०२२ रोजी दाखल केला आहे. परंतू सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्याकरीता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. परंतू सदर अर्ज दाखल करणेस विलंब करुन प्रकरण प्रलंबित केल्याने कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे-

## आदेश

१. निशाणी ११० कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी रुपये ३००/- इतकी कॉस्ट न्यायालयात नियमाप्रमाणे भरावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2022.10.17 17:30:14 +0530

**ठिकाण - इचलकरंजी.**
**दिनांक - १७/१०/२०२२**

**(एम.एम.चौधरी)**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**इचलकरंजी.**